# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २१ जानेवारी २०१४

## महिला सक्षमीकरणासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा-भवरी देवी

मुंबई- माझ्यावर झालेल्या अत्याचाराला जर मी वाचा फोडली नसती तर पुढच्या पीढीला न्याय मिळाला नसता,महिला सक्षमीकरणासाठी महिलांनी पुढाकार घ्यायला हवा तसेच त्यांच्यावर होणा-या अत्याचाराचा त्यानी सामना करायला हवा असे आवाहन भवरी देवी यांनी केले.मुंबई विद्यापीठाच्या महिला विकास कक्षातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. जिच्या असामान्य धैर्यामुळे कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक छळाबद्दल आज जो कायदा झालाय त्या भवरी देवींचा सत्कार मुंबई विद्यापीठाच्या महिला विकास कक्षातर्फे करण्यात आला.अतिशय साध्या आणि कणखर व्यक्तीमत्वाच्या भवरी देवीने उपस्थितांना तिच्यावर झालेल्या अत्याचाराचा सामना तीने कसा केला तसेच सत्तेवर असणा-या व्यक्तींशी लढा उभारण्याचं असामान्य धैर्य दाखवणा-या भवरी देवीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.महिला सक्षमीकरण हा साधा शब्द माहित नसलेल्या भवरी देवीने केलेल्या या कामगिरीचे आज सर्वत्र कौतुक केले जात आहे.विशाखा गाईडलाईन्सच्या निर्मितीसाठी भवरी देवी यांची महत्वाची भूमिका आहे. भवरी देवी यांच्या मुलाखतीला जोड होती ती एडव्होकेट जाई वैद्य यांच्या व्याख्यानाची,त्यांनी कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक छळाबद्दल डिसेंबर २०१३ मध्ये झालेल्या कायद्याचे अत्यंत सोप्या भाषेत स्पष्टीकरण देत त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

मुंबई विद्यापीठाच्या महिला विकास कक्षातर्फे आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्याला विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.राजन वेळूकर बोलतांना म्हणाले की,भंवरी देवींचे हे संभाषण मुंबई विद्यापीठाच्या सर्व सलंग्नित महाविद्यालयात आभासी वर्गखोलीच्या माध्यमातून पाठविले जाणार असुन ही चित्रफित नक्कीच प्रेरणादायी ठरणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला अंबरनाथच्या पी.डी.कारखानीस महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी छेडछाड क्यू ? हे पथनाट्य सादर केले.या कार्यक्रमाला बीसीयुडी संचालक डॉ.राजपाल हांडे यांची विशेष उपस्थिती होती.मुंबई विद्यापीठाच्या महिला विकास कक्षाच्या कार्यध्यक्षा डॉ.क्रांती जेजूरकर यांच्या विशेष प्रयत्नातून हा कार्यक्रम पार पडला.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)